

सोलापूर महानगरपालिका कामगार
कल्याण जनसंपर्क विभाग
ई – न्यूजलेटर



# सोलापूर महानगरपालिका व स्मार्ट सिटी च्या माध्यमातून ICCC (कमांड अँड कन्ट्रोल सेंटर)व इंद्र भवन इमारतीची आज पहाणी

Volume XI | Issue 13 | Date 22-11-2023

सोलापूर महानगरपालिका व स्मार्ट सिटी च्या माध्यमातून ICCC (कमांड अँड कन्ट्रोल सेंटर)व इंद्र भवन इमारतीची पहाणी आज महापालिकेच्या आयुक्त शीतल तेली-उगले यांनी केली. यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, कार्यकारी अभियंता विद्युत राजेश परदेशी,सहाय्यक अभियंता महादेव इंगळे, स्मार्ट सिटी चे मनीष कुलकर्णी, संगणक विभाग प्रमुख स्नेहल चपळगावकर, सहाय्यक अभियंता किशोर सातपुते,मतीन सय्यद,उमर बागवान आदी मान्यवर उपस्थित होते.शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी संपूर्ण शहरातील सुरक्षा व्यवस्थेवर देखरेख व नियंत्रण करणेकामी केंद्र शासनाच्या महत्वकांक्षी अशा इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटरच्या अमंलबजावणी करणेकरीता नियंत्रण कक्षाची आवश्यकता असलेने सोलापूर महानगरपालिकेच्या पाठीमागे नगर अभियंता कार्यालयाकडील भांडार गृहाच्या ठिकाणी नियंत्रण कक्षाची स्थापन करण्यात आली असून या इमारतीमध्ये शहरात स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत बसविणेत आलेल्या सीसीटीव्ही, एलईडी दिवे, कचरा संकलन केंद्राच्या गाड्या, पाणीपुरवठा वितरण प्रणाली व स्काड प्रणाली, ड्रेनेज बाबत तक्रारी,अग्निशमन विभाग,आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत आल्याला तक्रारी नोंद घेऊन निवरण करण्यात येईल तसेच यावर एकाच ठिकाणाहुन देखरेख होणार आहे. तसेच या ठिकाणी नागरिकांकरीता सोलापूर मनपाकडील, पोलिसांकडील आवश्यकत्या सुविधाचे एकत्रीकरण करणेत येणार आहे. या नियंत्रण कक्षामध्ये स्काडा प्रणालीचे नियंत्रण ही ठेवणेत आले आहे. तसेच शहरातील सुरक्षा व्यवस्था अबाधित राखणेकामी शहरातील १३० ठिकाणी सीसीटीव्ही बसवण्यात आलेले आहेत.आससीसी याद्वारे एकत्रित केले जाणार आहे. तसेच मनपाकडील कांही सेवा याद्वारे देणेत येऊन त्यांचे नियंत्रण केले जाणार आहे.सदरचे काम पूर्ण झाले असून लवकरच सुरू करण्यात येईल तसेच इंद्र भवन इमारतीचे काम पूर्ण झाले असून सगळे कार्यालय लवकरच स्थलांतरित करण्यात येईल.



